|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

## विद्यार्थी विकास विभाग

जा.क्र.कबचौउमवि/विवि-47/ 353 /2019 दि.10/12/2019

प्रति,

**मा.प्राचार्य/संचालक/विभाग प्रमुख/नियंत्रक अधिकारी**
**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्था**
**व विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/विभाग यांना -**

**विषय:-** **प्राचार्य / संचालक / विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या संयुक्त कार्यशाळेबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-46/192/2019, दि.23/07/2019

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष **2019-20** मध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचा आढावा व नियोजन करण्यासाठी तसेच त्यात अधिक परिणामकारकता व सुसूत्रता आणण्याच्या हेतूने विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने **जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील प्राचार्य / संचालक / विद्यार्थी विकास अधिकारी** यांची दुसऱ्या सत्रातील **समन्वय व सहविचार कार्यशाळा** **शुक्रवार दि.20 डिसेंबर, 2019** रोजी सकाळी **11.00** वाजता **शिरीष मधुकरराव चौधरी महाविद्यालय, जळगाव** येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

आपणांस कळविण्यात येते की, प्रस्तुत समन्वय व सहविचार कार्यशाळेत विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजना उदा.कमवा व शिका, युवती सभा, स्वयंसिध्दा अभियान, विद्यार्थी सुरक्षा अपघात विमा योजना, नियतकालीक स्पर्धा, विविध कार्यशाळा, स्पर्धा, कृतीसत्रे यांचे आयोजन व त्यातील विद्यार्थ्यांचा सहभाग, युवारंग-युवक महोत्सव, महाविद्यालयातील स्नेहसंमेलने, विद्यार्थी विकास उपक्रमाचे हिशेब व लेखे सादरीकरण आदी विषयांवर आढावा-सादरीकरण करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत आपल्या कडील जिल्हा क्षेत्र विद्यार्थी विकास अधिकारी व मुख्य विद्यार्थी विकास अधिकारी यांना सदर दिवशी सकाळी 10.30 वाजेपर्यंत उपस्थित राहाणे आवश्यक आहे.

उपरोक्त बाबीची नोंद घेऊन कृपया आपल्या महाविद्यालयातील प्राचार्य / संचालक / जिल्हा विद्यार्थी विकास समन्वयक / प्रमुख विद्यार्थी विकास अधिकारी यांना सदर सभेस आवर्जून उपस्थित राहाण्यासाठी अवगत करावे, ही विनंती.

कार्यशाळेच्या ठिकाणी नाश्ता, चहापान व दुपारच्या भोजनाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

(डॉ. सत्यजित साळवे)
**संचालक, विद्यार्थी विकास**

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

1) सर्व जिल्हा / क्षेत्र विद्यार्थी विकास समन्वयक (जळगाव, धुळे, नंदुरबार व कबचौउमवि परिसर)
2) मा. वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
3) प्र-उपकुलसचिव, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
4) उपकुलसचिव, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव
5) कक्षाधिकारी, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.
6) मा.जनसंपर्क अधिकारी, कबचौउमवि, जळगाव
7) मा. पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, कबचौउमवि, जळगाव

*D:\\\VBOXSVR\xp_data\RMB\SDO & Principal meeting 2019-2020.docx*

☎ : (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in